# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** विश्राम बाग

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0473 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/12/2024 12:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 28/12/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/12/2024

**Time From (वेळेपासून):** 11:31 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/12/2024 **Time (वेळ):** 12:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 016

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/12/2024 12:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विजयनगर चौक ,येथील हटेल माऊली,सांगली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीपाद रामचंद्र जोशी
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1957
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रकेल लाईन सांगली ,जि सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रकेल लाईन सांगली ,जि सांगली,विश्राम बाग,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9561360950

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश मारूती बोरकर | | | 1. 211 अर्जुन द बोरकर, यादव गल्ली,कवठेएकंद, तातासगाव,, जि सांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | युवराज मनोहर कांबळे | | | 1. बौध्द वसाहत, बेडग, ता मिरज, जिसांगली,विश्राम बाग,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दीजबाब दि. 30.12.2024

मी श्रीपाद रामचंद्र जोशी, वय 67 वर्ष, व्यवसाय:- रिटायर बँक ज्युनिअर ऑफीसर रा. रॉकेल लाईन सांगली जि. सांगली. मो.नं. 9561360950, 9404387080

मी वरील ठिकाणी पत्नी व मुलगा यांचेसह राहणेस आहे. माझी पत्नी डॉ. माधवी श्रीपाद जोशी यांनी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली व विलींग्डन कॉलेज सांगली येथे संस्कृत विषय शिकविण्यासाठी अर्धवेळ शिक्षीका म्हणून काम केले असून ती दि. 31.07.2024 रोजी सेवानिवृत्त झाली आहे.

माझी पत्नी हिचे श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली येथील दि.01.01.2021 ते दि. 31.10.2022 या कालावधीतील 11,19,438/- रूपये, विलींग्डन कॉलेज सांगली येथे दि.01.05.2021 ते 30.04.2022 या कालावधी मधील 4,36,624/- रूपये व दि.01.05.2022 ते 28.02.2023 या कालावधीतील 3,89,648/- रूपये असे एकुण 19,45,710/- रूपयांचे तिन बिल दोन्ही कॉलेज प्रशासन यांनी मंजुरी करीता मा. शिक्षणाधिकारी जिल्हापरिषद, सांगली यांचे मार्फत पे युनिट कार्यालय येथे पाठविले आहे. त्यानंतर सुमारे मागील 1 वर्षापासून मी तसेच माझी पत्नी असे पे युनिट कार्यालय येथे जावून आमचे पगार बिल मंजूरी करीता हेलपाटे मारत होतो परंतू अद्याप पर्यंत पे युनिट कार्यालय यांनी माझी पत्नी हिचे थकीत पगार बिल मंजूर केलेले नाही.

त्यानंतर मी पत्नी माधवी जोशी हिचे पगार बिला संदर्भात बोरकर, क्लार्क यांची भेट घेतली. त्यावेळी बोरकर क्लार्क यांनी माझी पत्नी माधवी जोशी हिचे श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली व विलींग्डन कॉलेज सांगली येथील थकीत पगार बिलाची रक्कम पे युनिट कार्यालयातील अधीक्षक करमुसे मॅडम व क्लार्क मंडले मॅडम यांना सांगुन मंजूर करणेकरीता माझ्याकडे बिल रक्कमेच्या 6 टक्के इतकी रक्कमेची लाचेची मागणी केली होती. परंतू श्री. बोरकर यांना आम्हाला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्शन कार्यालय सांगली येथील पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील यांची दि. 14.11.2024 रोजी सकाळी समक्ष कार्यालयात भेट घेवून माझी लाच मागणीची तक्रार कळवली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे माहिती देवून माझा श्री. बोरकर यांचेविरूध्दचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज हजर करण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा बोरकर यांचेविरूध्दचा लाच मागणीचा सविस्तर तक्रारी अर्ज पाटील साहेब यांना दिला. पाटील साहेब यांनी माझे तक्रारी अर्जावर सही केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेवून दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना माझी तक्रार थोडक्यात कथन केली. पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं.1 म्हणून समीरअली शेख व पंच नं.2 म्हणून मोनिका रावण यांनी काम करण्याचे ठरवले. त्यानंतर माझे तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून सह्या केल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचेकडील कर्मचारी यांची ओळख करून दिली.

श्री. बोरकर यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेबांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. श्री. बोरकर यांनी मला मिरज मिशन हॉस्पीटल येथे भेटण्यास बोलविले असल्याने सदर ठिकाणी त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब, मी व दोन्ही पंच व स्टाफ असे शासकीय वाहनाने 10.35 वा एसीबी कार्यालयात रवाना

होवून मिरज मिशन हॉस्पीटलचे अलीकडील सांहेबजान कॉम्प्लेक्स याठिकाणी 10.50 वा दाखल झालो. वर्दीजबाब दि. 30.12.2024

मी श्रीपाद रामचंद्र जोशी, वय 67 वर्ष, व्यवसाय:- रिटायर बँक ज्युनिअर ऑफीसर रा. रॉकेल लाईन सांगली जि. सांगली. मो.नं. 9561360950, 9404387080

मी वरील ठिकाणी पत्नी व मुलगा यांचेसह राहणेस आहे. माझी पत्नी डॉ. माधवी श्रीपाद जोशी यांनी श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली व विलींग्डन कॉलेज सांगली येथे संस्कृत विषय शिकविण्यासाठी अर्धवेळ शिक्षीका म्हणून काम केले असून ती दि. 31.07.2024 रोजी सेवानिवृत्त झाली आहे.

माझी पत्नी हिचे श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली येथील दि.01.01.2021 ते दि. 31.10.2022 या कालावधीतील 11,19,438/- रूपये, विलींग्डन कॉलेज सांगली येथे दि.01.05.2021 ते 30.04.2022 या कालावधी मधील 4,36,624/- रूपये व दि.01.05.2022 ते 28.02.2023 या कालावधीतील 3,89,648/- रूपये असे एकुण 19,45,710/- रूपयांचे तिन बिल दोन्ही कॉलेज प्रशासन यांनी मंजुरी करीता मा. शिक्षणाधिकारी जिल्हापरिषद, सांगली यांचे मार्फत पे युनिट कार्यालय येथे पाठविले आहे. त्यानंतर सुमारे मागील 1 वर्षापासून मी तसेच माझी पत्नी असे पे युनिट कार्यालय येथे जावून आमचे पगार बिल मंजूरी करीता हेलपाटे मारत होतो परंतू अद्याप पर्यंत पे युनिट कार्यालय यांनी माझी पत्नी हिचे थकीत पगार बिल मंजूर केलेले नाही.

त्यानंतर मी पत्नी माधवी जोशी हिचे पगार बिला संदर्भात बोरकर, क्लार्क यांची भेट घेतली. त्यावेळी बोरकर क्लार्क यांनी माझी पत्नी माधवी जोशी हिचे श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली व विलींग्डन कॉलेज सांगली येथील थकीत पगार बिलाची रक्कम पे युनिट कार्यालयातील अधीक्षक करमुसे मॅडम व क्लार्क मंडले मॅडम यांना सांगुन मंजूर करणेकरीता माझ्याकडे बिल रक्कमेच्या 6 टक्के इतकी रक्कमेची लाचेची मागणी केली होती. परंतू श्री. बोरकर यांना आम्हाला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्शन कार्यालय सांगली येथील पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील यांची दि. 14.11.2024 रोजी सकाळी समक्ष कार्यालयात भेट घेवून माझी लाच मागणीची तक्रार कळवली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे माहिती देवून माझा श्री. बोरकर यांचेविरूध्दचा लाच मागणीचा तक्रारी अर्ज हजर करण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा बोरकर यांचेविरूध्दचा लाच मागणीचा सविस्तर तक्रारी अर्ज पाटील साहेब यांना दिला. पाटील साहेब यांनी माझे तक्रारी अर्जावर सही केली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून घेवून दोन्ही पंचांची व माझी ओळख करून दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना माझी तक्रार थोडक्यात कथन केली. पाटील साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं.1 म्हणून समीरअली शेख व पंच नं.2 म्हणून मोनिका रावण यांनी काम करण्याचे ठरवले. त्यानंतर माझे तक्रारी अर्जावर दोन्ही पंचानी तक्रारी अर्ज वाचून सह्या केल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी त्यांचेकडील कर्मचारी यांची ओळख करून दिली.

श्री. बोरकर यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेबांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. श्री. बोरकर यांनी मला मिरज मिशन हॉस्पीटल येथे भेटण्यास बोलविले असल्याने सदर ठिकाणी त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब, मी व दोन्ही पंच व स्टाफ असे शासकीय वाहनाने 10.35 वा एसीबी कार्यालयात रवाना होवून मिरज मिशन हॉस्पीटलचे अलीकडील साहेबजान कॉम्प्लेक्स याठिकाणी 10.50 वा दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच शेख यांना पडताळणी कामी श्री. बोरकर यांचेकडे मिरज मिशन हॉस्पीटल येथे पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पडताळणी दरम्यान कसे बोलावे, काय बोलावे, लाच मागणीबाबत काय बोलावे व इतर सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 10.57 वाजता सुरु करून त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शेख असे मो.सा.क्र.एमएच 12 डब्ल्युएफ 8020 वरून रवाना होवून मिरज मिशन हॉस्पीटल जवळ दाखल झालो. त्यावेळी मी श्री. बोरकर यांना कॉल करून मिरज मिशन हॉस्पीटल येथे आलो असल्याचे सांगितले. काही वेळाने श्री. बोरकर हे सदर ठिकाणी मोटार सायकलने आलेने मी व पंच नं.1 शेख यांनी त्यांची सदर ठिकाणी भेट घेतली. त्यावेळी मी बोरकर यांना "नमस्कार सर....तेच काय काय करूया" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी मला "काय न्हाय, हाय तस हाय ते काय न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "होय" असे म्हणालो असता बोरकर यांनी "मग मी पण आता सोमवारी कोल्हापुरला

जाणार हाय..... ते आठ बिल हायत ना आमची..... गुरव मॅडम हायत कोल्हापुरात.... मला परवा दिवशी फोन आलता या म्हणुन.....मॅडम परवा सुद्धा काय म्हणले सोमवारी येतो म्हणुन सांगीतल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ते केव्हा भेटायच काय?" असे विचारले असता श्री. बोरकर यांनी "न्हाय हिथ तुम्ही विषय केला तर जावुन सांगणार ना, अस अस करा म्हणुन" असे म्हणाले. त्यावर मी त्याना "करमुसे मॅडमला सांगुन काय..." असे विचारले असता बोरकर यांनी "होय त्यांच पण हाय की त्यांच्याकडच हाय ओ, पण त्यांनी मला भेटायला बोलवलय ना" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मग आपण भेटायच काय काय कस?" असे विचारले असता बोरकर यांनी "न्हाय तुम्ही कस भेटणार, तुम्ही प्रत्यक्षाला भेटून देत नाहित, आता जर कोणा तर्फे आणी हे केल, मी फोनवर कधीच बोलत न्हाय काय असल तर डायरेक्ट सांगुन" असे म्हणाले.

त्यानंतर मी बोरकर यांना "आपली ओळख नसल्याचे सांगून, दोन्ही बिल मिळुन तरी म्हणला आठरा पर्यंत जाईल आपल ते" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "आठरा लाख रूपये?" असे विचारले असता मी त्यांना "हा" असे म्हणालो. त्यानंतर मी बोरकर यांना "आपल्याला किती येईल अंदाजे त्याला?" असे विचारले असता बोरकर यांनी "तुम्हाला मी सांगीतल की...सहा टक्के, सहा टक्के" असे म्हणून त्यांनी माझी पत्नी हिचे एकुण थकीत पगार बिल रक्कमेच्या 6 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "सहा टक्के" असे विचारले असता बोरकर यांनी "हो....आता मॅडमन रेट वाढवलाय म्हणत्यात आणी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कुणी करमुसे मॅडमनी? आता त्यांची भेट पुढची आपली भेट आता" असे विचारले असता बोरकर यांनी "मॅडम भेट होत न्हाय" असे म्हणून "सर तुमच जर न्हाय काम झाल नाय तर तुमच पैसे हाय तस रिटर्न माघारी, त्याची काय काळजी करू नका पैशाच विचार सुद्धा करू नका मी तुम्हाला माझा अॅड्रेस देतो आधार कार्डचा हे देतो आणी तुमचा जर विश्वास नसेल तर" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कस झालय दोन तिन वेळा असच फसलोय आम्ही हे प्रामाणीक" असे म्हणालो.
त्यानंतर मी बोरकर यांना "तुमची कोणती संस्था?" असे विचारले असता बोरकर यांनी "हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज" असे सांगितले. त्यानंतर मी बोरकर यांना करमुसे मॅडम यांची भेट घालून देणेची विनंती केली. त्यावर बोरकर यांनी मला मंडले मॅडम यांची भेट घालून देतो असे म्हणाले. त्यावर मी त्यांना करमुसे मॅडमची भेट घालून देणेची विनंती केली असता बोरकर यांनी "मला काय आगोदर सांगीतलय भेटीसाठी इकड कुणाला काय घेवुन येवु नको" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "होय मग काय औघड हाय.... सांगतो दोन तिन दिवसांनी" असे म्हणालो. त्यावर बोरकर हे "आकडा मोठा दिसला कणी हितन त्यासनी माहित नसतय कुठला हाय कर्मचा-यांचा पगार हाय काय ते सुदधा बघत न्हायत.......कमी रेटमधे व्हाव एवढच विषय हाय त्यात....आता तुमच आणी हिथ रेट वाढलाय सगळ्या गोष्टी मान्य हायत ओ त्याचा पगार हाय ओ काम केलाय त्यांना त्यान पगार घेतला न्हाय त्या पैशाच व्याज बिज काय हाय कणी" असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना "चालतय" असे म्हणून मी व पंच नं.1 शेख असे मोटार सायकलने तेथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने पाटील साहेबांनी केले पडताळणी कारवाईमध्ये, माझी पत्नी डॉ. माधवी श्रीपाद जोशी हिचे थकीत पगाराचे बिल अधीक्षक श्रीमती करमुसे व क्लार्क मंडले मॅडम यांना सांगुन मंजूर करणेकरीता श्री. बोरकर, क्लार्क यांनी एकुण थकीत पगार बिलाचे 6 टक्के प्रमाणे लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच श्री. बोरकर यांनी माझी, करमुसे मॅडम यांचेशी भेट घालून दिलेली नाही.

त्यादरम्यान माझे मोबाईलवर श्री. बोरकर, क्लार्क यांचा फोन येत असल्याची मी पाटील साहेब यांना सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी बोरकर यांचा फोन स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी बोरकर यांनी मला शंका वाटत असेल तर त्यांचे नावचा चेक देण्यास सांगून फोन कट कला. पाटील साहेब यांनी सदरचा कॉल डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केला आहे.
मी श्री. बोरकर यांना दोन तिन दिवसांत विचार करून सांगतो असे म्हणालेने तसेच लाच रक्कमेचा आकडा निश्चित करण्यासाठी आणि श्री. बोरकर यांचे लाच मागणीमध्ये अधीक्षक करमुसे व क्लार्क मंडले यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी श्री. बोरकर यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले.

दि.25.11.2024 रोजी मी पाटील साहेब यांची 13.50 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात भेट घेवून त्यांना मी व माझी पत्नी 8 दिवसांकरीता गावी गेलो असलेने आजरोजी मी बोरकर यांची आमचे पगार बिलाचे संदर्भात भेट घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी दोन्ही पंचांना कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे दोन्ही पंच 14.30 वा कार्यालयात हजर झाले.

त्यानंतर बोरकर यांचे भेटीची वेळ व ठिकाण निश्चित करण्यासाठी पाटील साहेब मला बोरकर यांना फोन करून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून

त्याची माहिती देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी 14.50 वा चे सुमारास माझे मोबाईल वरून बोरकर यांचे मोबाईल क्र.9689955076 वर कॉल केला असता बोरकर यांनी उदईक दि.26.11.2024 रोजी सिव्हील हॉस्पीटल येथे सकाळी साडेदहा ते अकरा पर्यंत येत असल्याचे सांगून आलेनंतर कॉल करीत असल्याचे सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

दि.26.11.2024 रोजी मी सकाळी 10.00 वा एसीबी कार्यालयात पाटील साहेब यांचेसमक्ष हजर झालो. त्यानंतर पाटील साहेब, पंच नं.2, मी व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व पंच नं.1 त्यांचेकडील खाजगी मोपेडने कार्यालयातून 10.30 वा रवाना होवून त्रिकोणी बाग परिसरामध्ये 10.40 वा दाखल झालो. त्यानंतर आम्ही श्री.बोरकर यांचा फोन येण्याची वाट पाहिली. परंतू बोरकर यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी बोरकर यांचे मोबाईलवर कॉल केला असता बोरकर यांनी गावामधून निघाले असल्याचे सांगून साडेअकरा पर्यंत येत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही बराच वेळ बोरकर यांचा फोन येण्याची वाट पाहिली परंतू बोरकर यांचा फोन न आल्याने पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी पुन्हा बोरकर यांना कॉल करून त्यांना जिल्हा परिषद जवळील नटराज हॉटेल येथे येण्याची विनंती केली असता त्यांनी येतो असे म्हणाले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डिमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पडताळणी दरम्यान कसे बोलावे, काय बोलावे, बोरकर यांनी लाच मागणीतल्यास काय बोलावे व इतर सुचना दिल्या. दरम्यान बोरकर यांचा मला फोन येत असल्याने पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचा कॉल स्विकारला असता बोरकर यांनी ते हॉटेल जवळ आले असल्याचे सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डिमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.23 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शेख असे हिरो मायस्ट्रो मोपेड क्र.एमएच 10 एई 6690 वरून रवाना होवून हॉटेल नटराज येथे दाखल झालो. त्यावेळी हॉटेल येथे बोरकर दिसत नसल्याने मी त्यांना कॉल केला. त्यानंतर काही वेळाने बोरकर हे हॉटेल येथे आलेनंतर मी व पंच नं.1 शेख यांनी त्यांची हॉटेलमध्ये भेट घेतली. त्यावेळी मी बोरकर, क्लार्क यांना "नेमक काय कराव" असे विचारले असता बोरकर यांनी "काय करू नका, तुम्हाला सांगितलय की सगळ सुटसुटीत करून दिलय की तुम्हाला.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "एकुण तिन बिल आहेत आमची, विलीग्डंनच आहे 4,36,624/- आणि 3,89,000/- आणि गरवारेच आहे 11,19,000/- असे एकुण.......सहा टक्के म्हणटल्यावर जरा" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "न्हाय ते तेवढ घेत्यातच ओ... त्याच्या पेक्षा काय आता आठ टक्के चालू हाय......तुमचा सहा टक्केच विषय आधी सांगुन ठेवलय, अस अस काम हाय, सहा टक्केच म्हणून एवढ" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "एवढ सहा टक्केन किती होणार?" असे विचारले असता बोरकर यांनी "काय कॉल्कुलेशन होईल ते..... ते सगळ्यांना पैसे जात्यात हित काय एकट खात नाहीत आ सगळ्यांना पैसे जात्यात.....आयुक्तापर्यंत ते किती येणार प्रत्येकाला दहा पंधरा हजार रूपये.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "एवढ बिल हाय काय करूया बघा तुमच्या हयान" असे विचारले असता बोरकर यांनी त्यांचे मोबाईलवर कॉल्यक्युलेशन करून मला "एक सोळा सातशे होत्यात.....एक सोळा सातशे" असे म्हणून आमचे एकुण बिल रक्कमेच्या 6 टक्के प्रमाणे 1,16,700/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी बोरकर यांना करमुसे मॅडमची भेट घालून देणेची विनंती केली असता बोरकर यांनी "भेटल की काम होत नाय ओ, आमच्या सर्कल मधन होतय." असे म्हणून "बिल हे कोल्हापूर व त्यानंतर पुणे कार्यालय व तेथून परत मंत्रालय येथे जात असल्याचे सांगून मंत्रालयात गेल की बिल लवकर पास होत नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मी बोरकर यांना बिल केव्हा मिळणार असे विचारले असता बोरकर यांनी "मार्चमध्ये" असे म्हणून "तुमच्या बिलाची गॅरंटी मी घेतो.....समजा काय प्रॉब्लेम झाला तर, घेतलेली रक्कम हाय तशी परत करणार..... एवढ्या पर्यंत गॅरंटी मी देतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "दोन तिन वेळा पोळलय" असल्याचे सांगितले. त्यावर बोरकर यांनी मला बिलाची ओसी मागितली असता मी त्यांना ओसी घेवून देतो असे सांगितले. त्यावर बोरकर यांनी त्यांच्याकडन ओसी घेवून जावा आणि द्या तुम्ही तिकड बघू सुध्दा नका" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुम्हाला आणि परत आणि द्यायला पाहिजे काय? असे विचारले असता बोरकर यांनी "आपण एक रूपया मागणार न्हाय काका तुमच्याकडन" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मंडळीशी चर्चा केली, रक्कम मोठी असल्यामुळ नेमक काय म्हणजे" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "तुम्हाला मी किती सांगितल, एक लाख सोळा हजार सातशे रूपये होत्यात.....आपल्याला कुणाचा काय एक रूपया नको हाय" असे म्हणून आमचे थकीत पगाराचे बिल करमुसे मॅडम यांना सांगुन मंजूर करण्याकरीता करमुसे मॅडम यांचेकरीता माझेकडे 1,16,700/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर बोरकर यांनी मला विश्वास नसेल तर त्यांचे नावाचा चेक देण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना "मी पण

रिटायर हाय, माझ सहासष्ट वय हाय...मंडळी पण रिटायर हायत, त्यामुळे पैशाची अँडजेसमेंट ऐवढी" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "पैसे सोडल्याशिवाय विषय हाय का?..एक तर लक्ष्मी खिशातन बाहेर पाठविल्याशिवाय आपल्या घरात येत न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "मॅडमशी चर्चा करून सांगतो....थोडीशी अँडजेसमेंट केली पाहिजी एवढी रक्कम उभी करायची" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "निम्मी अगोदर द्या....प्रोसेसमध्ये राहणार बिल...पास झाल्यावर रक्कम तुम्हाला द्यायला लागणार" असे म्हणून बोरकर हे तेथून निघून गेले. त्यानंतर मी व तक्रारदार असे मोटार सायकलने तेथून रवाना होवून पाटील साहेब व सापळा पथक थांबले ठिकाणी हजर झालो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, माझी पत्नी डॉ.माधवी श्रीपाद जोशी हिचे थकीत पगाराचे बिल लोकसेविका अधीक्षक श्रीमती करमुसे व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजूर करणेकरीता श्री. बोरकर यांनी अधीक्षक करमुसे यांचेकरीता माझेकडे एकुण थकीत पगार बिलाचे 6 टक्के प्रमाणे 1,16,700/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. मी श्री. बोरकर यांना माझी पत्नी हिचेशी चर्चा करून विचार करून सांगतो असे म्हणालेने तसेच श्री. बोरकर यांचे लाच मागणीमध्ये अधीक्षक करमुसे यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी श्री.बोरकर यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे पाटील साहेब यांनी सर्वानुमते निश्चित केले.

दि. 28.11.2024 रोजी सकाळी 08.11 वा चे सुमारास मी, पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब यांना संपर्क करून श्री. बोरकर, क्लार्क यांचा दि.27.11.2024 रोजी मला फोन आला असून त्यांनी दि. 28.11.2024 रोजी सकाळी 09.30 वा काँग्रेस भवन येथे भेटण्यास बोलविले असल्याचे सांगितली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला 09.00 वा काँग्रेस भवन येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी काँग्रेस भवन येथे जावून पाटील साहेब व सापळा पथकाची भेट घेतली. त्यानंतर आम्ही बोरकर यांचा फोन येण्याची वाट पाहिली. काही वेळाने बोरकर यांचा माझे मोबाईलवर कॉल आला. मी त्यांचा कॉल स्विकारला असता त्यांनी मला मिरज मिशन चौक येथे येण्यास सांगितले. त्यानंतर मी पाटील साहेब यांचे सुचनेप्रमाणे बोरकर यांना कॉल करून त्यांना विजयनगर चौक येथे येण्याची विनंती केली असता बोरकर यांनी तेथे आलेनंतर मला फोन करण्यास सांगितले. सदरचे दोन्ही कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले आहेत.

त्यानंतर पाटील साहेब, मी, पंच नं.2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व पंच नं.1 त्यांचेकडील खाजगी मोपेडने 10.45 वा काँग्रेस भवन येथून रवाना होवून विजयनगर चौक येथील हॉटेल 24 के चे समोरील रोडकडेला 11.00 वा चे सुमारास दाखल झालो. त्यावेळी 11.13 वा चे सुमारास बोरकर यांचा माझे मोबाईलवर फोन आल्याने पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचा कॉल स्विकारून त्यांना विजयनगर येथील हॉटेल माऊली येथे येण्याची विनंती केली असता त्यांनी दहा मिनीटात येत असल्याचे सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पडताळणी दरम्यान कसे बोलावे, काय बोलावे, बोरकर यांनी लाच मागणीतल्यास काय बोलावे व इतर सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.31 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शेख असे मोपेड क्र. एमएच 10 एई 6690 वरून रवाना होवून हॉटेल माऊली येथे दाखल झालो. त्यानंतर मी बोरकर यांना कॉल केला करून त्यांना माऊली हॉटेल येथे आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने बोरकर व त्यांचे सोबत एक अनोळखी इसम असे हॉटेल माऊली येथे येवून आमची भेट घेतली. त्यावेळी चर्चेवेळी बोरकर यांचेसोबत असले इसम हे युवराज कांबळे, शिक्षक असल्याचे व त्यांचेदेखील काम बोरकर यांचेकडे असल्याचे समजले. त्यानंतर चर्चेवेळी मी बोरकर यांना "रक्कम आपली किती? असे विचारले असता बोरकर यांनी "एक सोळा सातशे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना मॅडमशी काय बोलणे झाले का? असे विचारले असता बोरकर यांनी "फोन आलता, मी त्यांना बोललो अस अस.... या म्हणले, गेलो मॅडमकड तुमच करणार हाय ते, पटकन करा म्हटले काय उगचच एकाच हयाच्यात" असे म्हणाले. त्यानंतर माझे व बोरकर यांचे चर्चेमध्ये कांबळे यांनी सहभाग घेवून त्यांनी मला "लांबल म्हणजे परत त्याला वेगळ वळण लागतय" असे म्हणाले. त्यावर मी बोरकर यांना "कोणत्या मॅडमच?" असे विचारले असता बोरकर यांनी "करमुसे मॅडमच" असे म्हणाले. त्यानंतर मी बोरकर यांना करमुसे मॅडम यांचेशी फोनवर बोलणे करून देणेची विनंती केली असता बोरकर यांनी फोन करण्यास नकार देवून मला "बिनदास्त रावा ओ अस, अजुन काय रक्कमेला संरक्षण हाय.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "सगळ तुम्ही त्यांनाच देणार?" असे विचारले असता बोरकर यांनी "सगळ त्यांना देणार" असल्याचे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा बोरकर यांना करमुसे मॅडम यांना यांची भेट घालून देणेची विनंती केली असता बोरकर यांनी करमुसे मॅडम यांची भेट घालून देण्यास नकार

दिला. त्यावेळी कांबळे यांनी मला "सर, त्या अधिकारी हायत त्या पडद्या पाठीमाग राहुन काम करतात, समोर येत नाहीत, कुणीही बोलवल तरी येणार न्हाईत" असे म्हणाले. त्यावर बोरकर यांनी "तुमच्या पैशापैक्षा त्यांची नोकरी प्रिय" असे म्हणाले.

त्यानंतर कांबळे यांनी मला "विश्वास असला तर निवांत रहा, तुमच हे व्यक्ती काम करणार एवढ मी गॅरंटी देतो... आमच्या शाळेची सगळी काम हिच करत्यात" असे म्हणाले. त्यावर मी त्या दोघांना "बोरकर सरांची व करमुसे ओळख हाय आम्हाला तसे तुम्ही सांगाल तस करतो" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "लेखाधिकारी रविंद्र नवाळे यांना फोन लावतो, त्यांच्याच सहीन होत्यात बिल पास होत्यात" असे म्हणून लेखाधिकारी नवाळे यांना कॉल केला असता त्यांनी कॉल स्विकारला नाही. त्यावेळी कांबळे यांनी मला बोरकर हे तुमचे शंभर टक्के काम करून देतील तुम्ही निश्चित रहा असे म्हणाले. त्यानंतर मी पुन्हा बोरकर यांना करमुसे मॅडम अथवा मंडले मॅडम यांची भेट घालून देणेची अगर फोनवर बोलणे करून देणेची विनंती केली. त्यावर बोरकर यांनी मंडले मॅडम यांना फोन केला असता त्यांनी बोरकर यांचा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर बोरकर यांनी मला "निम्मे पैसे देण्यास सांगुन पैसे तुम्हाला 100 टक्के द्याव लागणार" असल्याचे सांगितले. त्यावेळी मी बोरकर यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता बोरकर यांनी "त्यात मी काय एक रूपया कमवणार न्हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "राऊंड करा" असे म्हणालो असता बोरकर यांनी "राऊंडला कस होईल..... एक दहा करा...एक दहा करा....एक सोळा जे हायत ना बिल, वरचे सहा हजार रूपये......एक दहा होणार" असे म्हणून त्यांनी माझेकडे 1,10,000/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी बोरकर यांना माझी पत्नी व करमुसे मॅडम यांची भेट घालून देणेची विनंती केली असता बोरकर यांनी नकार दर्शविला आहे. त्यावेळी बोरकर यांनी मला "काय असेल ते निर्णय पटकन सांगा, काय ते विषय पटकन संपला पाहिजे" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना बिल कधी जमा होणार असे विचारले असता बोरकर यांनी बिल मार्चमध्ये जमा होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आमचेमध्ये पगार बिला संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी कांबळे यांनी मला "प्रवाहाचा विरोधात जायच न्हाय, प्रवाहाच्या विरोधात गेला तर माणुस संपला" असे म्हणाले. त्यानंतर बोरकर यांनी मला "काका मला सांगा" असे म्हणून बोरकर व कांबळे हे हॉटेलमधून निघून गेले. त्यानंतर मी व तक्रारदार असे मोटार सायकलने तेथून रवाना होवून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये माझी पत्नी डॉ.माधवी श्रीपाद जोशी हिचे थकीत पगाराचे बिल लोकसेविका अधीक्षक श्रीमती करमुसे व मंडले क्लार्क यांना सांगुन मंजूर करणेकरीता श्री. बोरकर यांनी करमुसे मॅडम यांचेकरीता माझेकडे तडजोडी अंती 1,10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच बोरकर यांचे लाच मागणीवेळी युवराज कांबळे यांनी प्रत्यक्ष हजर राहून आमचे चर्चेमध्ये सहभाग घेवून मी लाच रक्कम बोरकर यांना देण्यास प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पाटील साहेब, दोन्ही पंच, मी व सापळा पथक असे तेथून रवाना होवून एसीबी कार्यालयात दाखल झालो.

श्री. बोरकर यांनी मला, अधीक्षक करमुसे मॅडम अथवा मंडले मॅडम यांची भेट घालून देणेस नकार दिला असल्याने पाटील साहेब यांनी मला व माझी पत्नी डॉ.माधवी जोशी, यांना बोरकर, क्लार्क यांचेकडे पुन्हा पाठवून त्यांना अधीक्षक करमुसे मॅडम अथवा मंडले मॅडम यांची भेट घालून देणेची विनंती करून त्यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी 13.20 वा चे सुमारास माझे मोबाईलवरून बोरकर यांना कॉल करून त्यांना माझी पत्नी माधवी हिची खातरजमा होणेकरीता त्यांची विजयनगर चौक येथील हॉटेल माऊली येथे भेट घेण्याची विनंती केली असता बोरकर यांनी एक तासाभरात येत असल्याचे सांगितले. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केला आहे.

त्यानंतर पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी पत्नी माधवी जोशी हिस घेवून एसीबी कार्यालयात दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक व मी व माझी पत्नी असे शासकीय वाहनाने कार्यालयातून 14.40 वा रवाना होवून विजयनगर चौक येथील हॉटेल 24 के येथे 14.55 वा चे सुमारास रोडकडेला दाखल झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व माझी पत्नी माधवी जोशी यांना पडताळणी दरम्यान कसे बोलावे, काय बोलावे, बोरकर यांनी लाच मागणीतल्यास काय बोलावे व इतर सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.57 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी, माझी पत्नी माधवी जोशी व पंच नं.1 शेख असे पायी चालत रवाना होवून हॉटेल माऊली जावून बोरकर यांची भेट घेतली. त्यावेळी मी बोरकर यांना "आमची मंडळी" असे म्हणून माझ्या पत्नीची ओळख करून दिली. त्यावर बोरकर यांनी "काय म्हणुन सर्विसला होते?" असे विचारले असता माधवी जोशी यांनी "पार्ट टाईम टिचर म्हणून मथुबाई गरवारे

महाविद्यालय व विलींग्डन कॉलेज येथे संस्कृत विषय शिकवत असल्याचे" सांगितले. त्यावर बोरकर यांनी आम्हास प्रस्तावाची कॉपी देण्यास सांगितले असता माधवी जोशी यांनी "कॉलेजमध्ये विचारणा केली तर ऑनलाईन पाठविले म्हणत्यात" असे म्हणाल्या. त्यानंतर बोरकर यांनी मला व माझी पत्नी माधवी यांना त्यांचे बिला संदर्भातची माहिती विचारून कॉलेजचे कव्हरिंग लेटर अथवा डीडीओ क्रमांक याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना आमचे बिलाची रक्कम सांगितली. त्यानंतर बोरकर यांनी "मॅडमला पण मी हयांनी सांगितलेली रक्कम सांगितल्या, आठरा...." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना कोणत्या मॅडम? असे विचारले असता बोरकर यांनी "करमुसे मॅडम" असे म्हणून "भ्रम निर्माण होतय...एकदा भ्रम निर्माण झाला की...आकडे वेगवेगळे झाले ना....अठरा लाख सांगितलय पर म्हणताय एकोणीस लाख" असे म्हणाले.

त्यानंतर माधवी जोशी यांनी बोरकर यांना "करमुसे मॅडम अथवा मंडले मॅडम यांची भेट घालून देणेची अगर फोनवर बोलणे करून देणेची विंनती केली असता बोरकर यांनी मंडले मॅडम यांना फोन लावला असता त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतर मी बोरकर यांना "किती एक लाख दहा हजार?" असे विचारले असता बोरकर यांनी "एक लाख दहा हजार, त्यातल निम्म आत्ता द्या म्हणल" असे म्हणून माझेकडे व माझी पत्नी माधवी जोशी हिचेकडे 1,10,000/- रूपये लाचेची मागणी करून त्यातले निम्मे पैसे लागलीच देण्यास सांगितले. त्यावर पत्नी माधवी जोशी हिने बोरकर यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता बोरकर यांनी रक्कम कमी करणेस नकार दिला. त्यानंतर मी बोरकर यांना "रक्कम गोळा करायला थोडा वेळ लागणार असल्याचे सांगून सोमवारी रक्कम देतो" असे म्हणालो असता बोरकर यांनी "एवढया लांब नाय....उद्या दुपारनंतर जाणार मी....सारख सारख चिघळतय ना... उद्याच सब्मीट करणार बिल, लगेच सोमवारी मंगळवारी करून मॅडम कड देणार, हयाच्यानंतर लगेच नविन व्यवहार चालू होणार" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आत्ता हे पैसे लगेच देण्यार त्यांना" असे विचारले असता बोरकर यांनी "काही ठराविक हे असत्यात ओ, आठवडयाच हे झालेल त्यांनी एक ठिकाण आसतय त्याठिकाणी द्यायच असतय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "चालतय, उद्या रक्कम जुळणा झाली तर बघतो, तुम्हाला फोन करतो" असे म्हणालो. त्यावर बोरकर यांनी "हा" असे म्हणून तेथून निघून गेले. त्यानंतर मी, पत्नी माधवी जोशी व पंच नं.1 शेख असे पायी चालत तेथून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला, पत्नी माधवी जोशी व पंच शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, माझी पत्नी डॉ.माधवी श्रीपाद जोशी हिचे थकीत पगाराचे बिल अधीक्षक श्रीमती करमुसे व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजूर करणेकरीता श्री. बोरकर यांनी माझेकडे व माझी पत्नी माधवी जोशी यांचेकडे अधीक्षक करमुसे यांचेकरीता आमचेकडे 1,10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला श्री. बोरकर यांनी लाच म्हणून द्यावी लागणारी रक्कम उदईक दि. 29.11.2024 रोजी उपलब्ध होईल का? याबाबत विचारणा केली असता मी त्यांना रक्कम मोठी असल्याने दोन-तीन दिवस लागणार असल्याचे सांगितले.

दि.29.11.2024 रोजी पाटील साहेब यांनी मला कॉल करून श्री.बोरकर यांना लाच म्हणून द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध झाली का? याबाबत विचारणा केली असता, मी त्यांना रक्कम अजुन उपलब्ध झाली नसल्याचे सांगून, सकाळी 11.26 वा बोरकर यांचा मला फोन आल्याचे सांगून त्यांनी दुपारी 05.00 वा पर्यंत रक्कमेची जुळणी करण्यास सांगितले असल्याची माहिती दिली.

त्यानंतर मी पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे 15.10 वा त्यांची कार्यालयात भेट घेतली. त्यानंतर दोन्ही पंच देखील कार्यालयात हजर झाले. श्री.बोरकर यांना लाच म्हणून द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध न झाल्याने, मी माझे मोबाईलवरून 15.45 वा चे सुमारास श्री. बोरकर यांना फोन करून त्यांचेकडून अवधी मागुन घेतला असता त्यांनी सोमवार दि.02.12.2024 रोजी रक्कम उपलब्ध झाल्यानंतर त्यांना फोन करण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच पाटील साहेब यांनी दि.02.12.2024 रोजी प्रथम लोकसेविका अधीक्षक करमुसे व मंडले, क्लार्क यांचेकडे मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय सांगली येथे मला व पंच नं.1 शेख यांना पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

दि. 02.12.2024 रोजी रोजी मी सकाळी 10.50 वा एसीबी कार्यालयात पाटील साहेब यांचेसमक्ष हजर झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 शेख यांना अधीक्षक करमुसे व क्लार्क मंडले यांचेकडे पाठवून त्यांची पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब, पंच नं.2, मी व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व पंच नं.1 त्यांचेकडील खाजगी मो.सा.ने कार्यालयातून 11.15 वा रवाना होवून विजयनगर चौक येथील दयानंद हौसींग सोसायटी येथे 11.45 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पडताळणी दरम्यान कसे बोलावे, काय बोलावे, अधीक्षक करमुसे व मंडले यांनी

लाच मागणीतल्यास काय बोलावे व इतर सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.31 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शेख असे पंचांचे खाजगी मो.सा. वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय सांगली येथील पे युनिट कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी मी मंडले क्लार्क यांची भेट घेतली. त्यावेळी मी मंडले मॅडम यांचेजवळ गेलो असता त्यांनी मला "प्रोसेजर मध्ये आहे सध्या...आता इथून कोल्हापूरला जाणार, मॅडमला सहिला ठेवलय पुढ" असे म्हणाल्या असता मी त्यांना "विचारण्यासाठी आलतो..तिन बिल हायत ना?" असे म्हणालो. त्यानंतर मंडले मॅडम यांनी "सगळेच गड्डे आत हायत, झाल तयार आता जातील" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "बिल केव्हा होणार अंदाजे" असे विचारले असता मंडले यांनी "मार्च एंडींग.....होईल, काय असेल तर सांगेन मी तुम्हाला" असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना "बोरकर म्हणून कोणतर भेटले होते आम्हाला" असे बोललो असता मंडले यांनी "काय म्हणले, कोण बोरकर, कुणाला भेटले?" असे विचारले असता मी त्यांना "मला इथ भेटलेते... बोरकर वगैरे कोण न्हाई ना शिक्षक" असे विचारले असता मंडले यांनी "न्हाई न्हाई, कोण बोरकर, काय माहिती न्हाई मला, कोण बोरकर.... आम्ही कॉलेज थ्रुच करणार..." असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना करमुसे मॅडम यांना भेटायला पाहिजे का? असे विचारले असता मंडले यांनी "आता सध्या तर काय गरज नाही...गरज असेल तर सांगते" असे म्हणाल्या. त्यानंतर मी, व पंच नं.1 शेख असे तेथून रवाना होवून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेविका मंडले क्लार्क यांनी आमचे बिल मार्चमध्ये जमा होत असल्याचे सांगून श्री. बोरकर यांना ओळखत नसल्याचे सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

मी लोकसेविका अधीक्षक करमुसे यांची भेट घेतली नसल्यामुळे पाटील साहेब यांनी मला व पंच नं.1 शेख यांना अधीक्षक करमुसे यांचेकडे पाठवून त्यांची पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पडताळणी कारवाई वेळी दिले सुचनांची उजळणी करून दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.15 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 शेख असे खाजगी मो.सा. वरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथील पे युनिट कार्यालयात दाखल झालो. त्यावेळी मी अधीक्षक करमुसे यांची त्यांचे कक्षामध्ये भेट घेतली. त्यावेळी मी त्यांना माझे नाव सांगून माझे मंडळींचे तिन बिल थकीत असल्याचे सांगितले. त्यावर करमुसे मॅडम यांनी "कसल बिल हाय" असे विचारले असता मी त्यांना "गरवारे कॉलेजच" असे म्हणालो. त्यावर करमुसे यांनी "ऑनलाईन केलय ना?....मग होईल, काय त्रुटी वगैरे काय न्हाय तुमची" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "अडचण काय येणार नाय ना?" असे विचारले असता करमुसे यांनी "न्हाय अडचण काय न्हाय येणार....पण व्यवस्थीत असल तर जाईल पुढ" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "इथ बोरकर म्हणून शिक्षक भेटलेले.....ते काम करून देतो म्हणले, त्यांनी पैसे मागितले म्हणून म्हणल...सहा टक्के" असे म्हणालो. त्यावर करमुसे यांनी "न्हाई..न्हाई... कोणालाही पैसे वगैरे देवु नका बर का.....बोरकर कोण?...कुठेल हायत?" असे विचारले असता मी त्यांना "हिंद एज्युकेशन अस काय तर संस्था...नरवाडला" असे म्हणालो. त्यावर करमुसे यांनी "एक रुपया सुध्दा देवू नका....बाहेरची लोक आमच्या जिवावर कमावतेत काय कळत न्हाय मला....कोण काय, त्याला आणा बघा धरून" असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना "होईल ना माझ काम मॅडम" असे विचारले असता करमुसे यांनी "कुणाला एक रुपया सुध्दा देवू नका हा...फायनल अॅथॉरिटी मी आहे, बाहेर कोणी असे सहा टक्केत देतो म्हणले तर कोणालाही द्यायच नाही.....ही लोक आपल्या खिश्यात घालत्यात आणि काम आमच्याकडन करून घेतात" असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना "तुमच नाव सांगितल म्हणून" असे म्हणालो. त्यावर करमुसे यांनी "कुठ, मी कुणालाच काय सांगितल नाही" असे म्हणाल्या. त्यानंतर करमुसे यांनी माझे व पत्नी हिचे नाव विचारून घेवून "कोणालाही एक रुपया सुध्दा देवू नका मी सांगते तुम्हाला" असे म्हणालेने मी त्यांना "धन्यवाद" असे म्हणून मी, व पंच नं.1 शेख असे तेथून रवाना होवून पाटील साहेब यांचे समक्ष हजर झालो. पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला. त्यानंतर पाटील साहेबांनी मला व पंच नं.1 शेख यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, अधीक्षक करमुसे यांनी माझेशी आमचे थकीत पगार बिलाबाबत चर्चा करून श्री. बोरकर यांना ओळखत नसल्याचे सांगून मला बिलाचे संदर्भात कोणालाही पैसे न देण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर श्री. बोरकर यांनी मला रक्कमेची जुळणी झाल्यानंतर कॉल करणेस सांगितले असल्याने पाटील साहेब यांनी श्री. बोरकर यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करून मला श्री. बोरकर यांना लाच

म्हणून द्यावी लागणारी रक्कम उपलब्ध आहे का? असे विचारले असता मी त्यांना रक्कम उपलब्ध केली असल्याचे सांगितले.

त्यानंतर सापळा कारवाईचे ठिकाण निश्चित करण्यासाठी पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नं. 9561360950 वरून श्री. बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर 14.14 वाजता कॉल केला असता त्यांनी माझा कॉल कट केला. त्यानंतर बोरकर यांचा मला कॉल आल्याने मी त्यांचा कॉल स्विकारून त्यांना "तुम्ही म्हणलाता...त्याप्रमाणे जुळणी केलेली आहे" असे म्हणालो असता बोरकर यांनी "दवाखान्यात आलुय, उद्या फोन करतो...सिरीयस प्रॉब्लेम हाय जरा...उद्या आकरा-बारा वाजता फोन करतो" असे बोलून फोन कट केला. सदर कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केला आहे. झाले एकंदरीत सापळा पुर्व कारवाईमध्ये, श्री. बोरकर, क्लार्क यांनी मला ते दवाखान्यामध्ये आले असल्याचे सांगून दि.03.12.2024 रोजी 11.00 वा. नंतर फोन करीत असल्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पाटील साहेब यांनी श्री. बोरकर यांचेविरूध्द दि.03.12.2024 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

दि. 03.12.2024 रोजी मी सकाळी 11.10 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात पाटील साहेब यांचेसमक्ष हजर झालो. त्यानंतर पाटील साहेब यांनी विजयनगर चौक येथील दयानंद हौसींग सोसायटी येथून श्री.बोरकर यांचेविरूध्द सापळा पुर्व कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब, दोन्ही पंच, मी व सापळा पथक असे शासकीय वाहनाने एसीबी कार्यालयातून 11.20 वाजता रवाना होवून विजयनगर चौक दयानंद हौसींग सोसायटी येथे 11.45 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर श्री. बोरकर यांनी मला आकरा-बारा नंतर कॉल करीत असल्याचे सांगितले असल्याने आम्ही श्री. बोरकर यांचा कॉल येण्याची वाट पाहिली. परंतू बोरकर यांचा कॉल न आल्याने मी 13.03 वाजता चे सुमारास माझे मोबाईल नंबर 9561360950 वरून श्री. बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता बोरकर यांनी माझा कॉल स्विकारला नाही.

त्यानंतर मी पुन्हा माझे मोबाईल नंबर 9561360950 वरून श्री. बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता त्यांनी माझा कॉल कट केला. त्यानंतर मी 13.48 वा चे सुमारास माझे दुसरे मोबाईल नंबर 9404387080 वरून श्री.बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारून माझा आवाज ऐकुन त्यांनी कॉल कट केला. त्यानंतर मी 14.26 वा चे सुमारास माझे दुसरे मोबाईल नंबर 9404387080 वरून श्री.बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता त्यांनी माझा कॉल कट केला. वरील सर्व कॉल हे पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड केले आहेत. झाले एकंदरीत सापळा पुर्व कारवाईमध्ये, श्री. बोरकर, क्लार्क यांनी माझा कॉल स्विकारला नसल्याचे निष्पन्न झाल्याने पाटील साहेब यांनी सापळा कारवाई तात्पुरती स्थगित आली.

दि.09.12.2024 रोजी पाटील साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी 13.05 वाजता पाटील साहेब यांची एसएफसी मॉलचे पार्किंगचे बाजूस भेट घेतली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला बोरकर, क्लार्क यांचे मोबाईलवर कॉल करून सापळा कारवाईची वेळ व ठिकाण निश्चित करण्याचे ठरविले. त्यानंतर 13.29 वा व 13.34 वा चे सुमारास मी माझे मोबाईल नंबर 9561360950 वरून श्री. बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता मोबाईलची एक रिंग होवून कॉल कट झाला. त्यावरून बोरकर यांनी माझा मो.नं. 9561360950 हा ब्लॉक लिस्टमध्ये टाकला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मी 13.38 वाजता व 13.41 वाजता चे सुमारास मी माझे दुसरे मोबाईल नंबर 9404387080 वरून श्री.बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता बोरकर यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर मी माझी पत्नी माधवी हिचा मोबाईल उपलब्ध करून घेवून माझी पत्नी माधवी जोशी हिचे मोबाईल नंबर 9158084549 वरून 13.56 वा चे सुमारास श्री. बोरकर यांचे मोबाईल नंबर 9689955076 यावर कॉल केला असता त्यांनी कॉल स्विकारला नाही. वरील सर्व कॉल हे पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड केले आहेत.
झाले एकंदरीत सापळा पुर्व कारवाईमध्ये, बोरकर यांनी माझा पहिला मो.नं. 9561360950 हा ब्लॉक लिस्ट मध्ये टाकला असून मी माझे दुसरे मोबाईल नंबर वरून व माझी पत्नी माधवी जोशी हिचे मोबाईल वरून बोरकर यांना कॉल केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारला नसल्याने पाटील साहेब यांनी सापळा कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर मी पाटील साहेब यांना, करमुसे अधीक्षक अथवा मंडले क्लार्क यांनी बोरकर यांना मी त्यांचेकडे बिलाचे चौकशी करीता गेलो असल्याचे सांगितले असल्याने, बोरकर यांना माझेबाबत शंका आली असण्याची शक्यता आहे. तसेच बोरकर यांनी माझा मोबाईल नंबर ब्लॉक लिस्ट मध्ये टाकला असून दुसरे नंबर वरून फोन केला असता ते माझा कॉल स्विकारत नसल्याने बोरकर, क्लार्क आता माझ्याकडे लाचेची मागणी करून लाच स्विकारणार नाहीत

असे मला वाटत असल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी माझा सविस्तर जबाब दोन्ही पंचांसमक्ष नोंदविला. श्री. बोरकर यांनी माझ्याकडे माझी पत्नी माधवी जोशी हिचे थकीत पगार बिलाची रक्कम करमुसे अधीक्षक व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजूर करणेसाठी करमुसे मॅडम यांचेकरीता माझेकडे तडजोडी अंती 1,10,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच बोरकर यांचे लाच मागणीवेळी, श्री.युवराज कांबळे यांनी प्रत्यक्ष हजर राहून आमचे चर्चेमध्ये सहभाग घेवून मी लाच रक्कम बोरकर यांना देणेकरीता प्रोत्साहन दिले आहे. तसेच सापळा पुर्व कारवाईवेळी बोरकर यांनी माझा कॉल स्विकारला नसून मला भेटण्यास टाळाटाळ करीत आहेत.

तरी दि. 28.11.2024 रोजीचे 11.31 वा ते 12.09 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान श्री. उमेश मारूती बोरकर, वय-37 वर्षे, व्यवसाय- निदेशक (शिक्षक) हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल नरवाड, वर्ग-3 रा. 211 अर्जुन द बोरकर, यादव गल्ली, कवठेएकंद, ता.तासगाव, जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझी पत्नी माधवी जोशी हिचे थकीत पगार बिलाची रक्कम करमुसे अधीक्षक व क्लार्क मंडले यांना सांगुन मंजुर करणेसाठी करमुसे अधीक्षक यांचेकरीता माझेकडे तडजोडीअंती 1,10,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच श्री. युवराज मनोहर कांबळे, वय-55 वर्षे, व्यवसाय- ज्युनियर क्लार्क, हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल सोनी, वर्ग-3 रा. बौध्द वसाहत, बेडग, ता.मिरज, जि.सांगली यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने बोरकर क्लार्क यांचे लाच मागणीवेळी प्रत्यक्ष हजर राहून आमचे चर्चेमध्ये सहभाग घेवून मी लाच रक्कम बोरकर, क्लार्क यांना देणेकरीता प्रोत्साहन दिले असल्याने, 1) श्री. उमेश मारूती बोरकर, वय-37 वर्षे, व्यवसाय- निदेशक (शिक्षक) हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल नरवाड, वर्ग-3 व 2) श्री. युवराज मनोहर कांबळे, वय-55 वर्षे, व्यवसाय- ज्युनियर क्लार्क, हिंद एज्युकेशन सोसायटी मिरज अंतर्गत न्यु इंग्लिश स्कुल सोनी, वर्ग-3 यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील वर्दी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष                                हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

pravinkumar devappaa kamble(I (Inspector)) / 15101000402ssmgm8202y

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):                **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्यां पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): pravinkumar devapp

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402ssmgm82

पोलीस स्टेशन ऑफिसर,
विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली